# नेतृत्व संकल्पनेचा अन्वयार्थ

**डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**. प्राध्यापक व विभागप्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग, समन्वयक, नेहरु अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :**'नेतृत्व' व 'राजकीय नेतृत्व' या दोन्ही संकल्पनांचा वेगवेगळा विचार केलातरी राजकीय या व्यापक संज्ञेमुळे नेतृत्व या . संकल्पनेला एक वेगळी दिशा प्राप्त झाली आहेहे राज नेतृत्व .कीय आहे अथवा गैर राजकीय आहे असा स्पष्टपणे फरक करणे सोपे नाहीकित्येक वेळा आर्थिक ., धार्मिक, शैक्षणिक तथा सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रातील व्यक्तींना निवडणुकीत उभे राहण्यासाठी राजकीय पक्षांची तिकिटाद्वारे उमेदवारी मिळतेत्या .ंच्या क्षेत्रातील लोकप्रियतेमुळे ते निवडून येतात व ते राजकीय नेते ,पुढारी बनतात यावरुन नेता अथवा पुढारी हा .शब्द सर्वसामान्य अर्थाने 'राजकीय नेतृत्वासाठी' वापरला जातो .'नेतृत्व' ही संज्ञा देखील अपरिमित आहेकारण प्राचीन काळा .तील राजापासून तर वर्तमान काळातील राजकीय नेत्यापर्यंत सर्वांचा यामध्ये अंतर्भाव आहे.

**नेतृत्व संकल्पनेचा अर्थ :** ''समूहाचे उद्दिष्ट प्राप्त करण्याकरिता अनुयायी म्हणविल्या जाणाऱ्या लोकांना एकात्मतेने वागण्यास उत्तेजन देणारी ही एक वागण्याची पद्धती आहे. नेतृत्वावर व्यक्तीचे गुणदोष, तिचे स्थान व त्यानुरूप घेतलेली भूमिका यांचा परिणाम होत असला, तरी ते सामान्यतः परिस्थिती निर्मित असते. नेतृत्वाच्या परंपरागत विचारात शूरत्व किंवा मर्दुमकी हे व यांसारखे सार्वत्रिक गुणविशेष महत्त्वाचे ठरतात पण नेतृत्वाचा विचार करताना परिस्थितीचाही विचार महत्त्वाचा असतो. सुप्त, कृतक तसेच वास्तविक अशा नेतृत्वातील फरकांचा विचार करावा लागतो. त्याचप्रमाणे नेतृत्वाचे तंत्र व भूमिका यांतील भेद, नेतृत्वाची प्रक्षेपित प्रतिमा व अनुयायांचे स्वभाव आणि प्रतिसाद यांचाही अभ्यास आवश्यक ठरतो. समान हीतसंबंध किंवा ध्येय असणाऱ्या समूहाचे व व्यक्तीचे परस्परसंबंध नेतृत्वाद्वारे दिग्दर्शित होतात, असे काही लोक मानतात. नेतृत्वाच्या संदर्भात माओवादाचे प्रवर्तक **माओ त्से तुंग** यांच्या मते ''खरा नेता कोणता? तर ज्याचं अस्तित्व लोकांना जाणवतही नाही तरीही त्यानं हातात घेतलेलं काम पूर्ण होतं. त्याचं ध्येय पूर्ण होतं. अन् लोक म्हणतात – हे काम तर 'आम्ही' केलं तसेच .**मॅक्स डी. प्री.,** ह्या ख्यातनाम अमेरिकी व्यावसायिक व लेखकाच्या मते कोणत्याही नेत्याची पहीली जबाबदारी म्हणजे वस्तुस्थितीची जाणीव करून देणं अन् शेवटची जबाबदारी म्हणजे आभार मानणं. या दोन गोष्टींच्या मधल्या काळात नेत्याचं वर्तन एखाद्या सेवकासारखच हव."[१] ख्यातनाम लेखक व द लीडरशिप इन्स्टिटय़ूट ऑफ युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियाचे संस्थापक-अध्यक्ष **वॉरन बेनिस यांच्या मते** एखादं स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याची क्षमता म्हणजे नेतृत्व, नेतृत्वासंदर्भातली सर्वात भयंकर दंतकथा म्हणजे नेता जन्मजात असतो. जणू काही नेता बनणं ही काही तरी आनुवंशिक बाब असते. प्रत्यक्षात नेता जन्मजात नसून तो घडवला जातो-घडतो ,**महात्मा गांधी** च्या मते नेतृत्व, शारीरिक सामर्थ्यावर अवलंबून असतं, असं मला वाटायच पण प्रत्यक्षात नेतृत्व अनेक लोकांना तुम्ही सांभाळून कसे घेता यावर अवलंबून असत."[२]

प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व हा मूलभूत स्वरूपाचा महत्वपूर्ण घटक असून त्याचे सर्वदूर व्यापक संबंध दिसून येतातप्रत्येक क्षेत्रात . प्रभावी व्यक्तिमत्वम्हणजे नेता व त्यांना मानणारी दुय्यम व्यक्तिमत्व म्हणजे अनुयायी यांच्या परस्पर संबंधावर विविध संस्था विकसित होताना दिसतात:विविध सामाजिक शास्त्रांच्या आणि विशेषत . राजकीय मानसशास्त्राच्या विकासाबरोबर नेतृत्व या विषयावर सर्वागीण प्रकाश पडत असून त्यामधून राजकीय नेतृत्वाच्या अध्ययनाचे विशाल दालन खुले झाले आहेम्हणूनच सेलिंगमन या . विचारवंताने, नेतृत्वाद्वारे राजकारण हे आधुनिक काळाचे ठळक वैशिष्टय होय असे म्हटले आहे.जॉर्ज एच . सेबाईनच्या मताप्रमाणे, "कलाकार ज्याप्रमाणे मातीला वळण देतोतसे नेते . लोकांना वळवितात.[३]

या प्रकारे नेतृत्व या संकल्पनेबद्दल एकमत नाही नेतृत्वामध्ये मैत्रीपूर्ण ,नेतृत्व महान मानव किंवा अवतारधारी नसते" सत्तावाटपाच्या नि ,अस्मितांचे विविध रंग ,हीतसंबंधाचे दावे ,तीव्र राजकीय संघर्ष ,वाटाघाटी:पक्षपाती वाटाघाटीअनुयायांच्या , स ,संघटनासाठी लक्षवेधक कार्यक्रमत्तेचा तीव्र संघर्ष असतो".[४] नेतृत्वाच्या पुढील प्रमाणे व्याख्या दिसून येतात या .व्याख्यांमध्ये देखिल भिन्नता आढळते .जितके विचारवंत तितक्या व्याख्या आहेत .'जेम्स मॅकग्रागर बन्सन' यांनी अशा १३० व्याख्यांचा उल्लेख केला आहेत्यातील प्रमुख व्याख्यांचा समावे .श खालीलप्रमाणे करता येईल .

- वेबस्टर यांच्या मते ''नेतृत्व म्हणजे अशी व्यक्ती जी समुहाला निर्देश देते, आज्ञांकित करते अथवा प्रमुख म्हणून मार्गदर्शन करते''[५]
- मॅक्स वेबर यांच्या मते ''स्वतःच्या व्यक्तीगत गुणांच्याद्वारे तथा त्याला प्राप्त होणाऱ्या साधन स्त्रोत यांच्यावरील नियंत्रणामुळे जो समुहातील लोकांना प्रायोजित तथा प्रोत्साहीत करुन त्यांच्या वर्तनाला प्रभावित करु शकतो त्याला ढोबळमानाने 'नेता' म्हणता येते . तर'नेतृत्व' म्हणजे अशीपध्दती की जिच्यामध्ये पुढारी विशिष्ट संदर्भात आपल्या शैलीद्वारा प्रभाव तथा शक्तीचा उपयोग करतात".[६]
- मराठी विश्वकोश मधील ''समुहाचे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी अनुयायी म्हणवल्या जाणाऱ्या लोकांना एकात्मतेने वागण्यास उत्तेजन देणारी ही एक वागण्याची पध्दती आहे".[७]
- रिचर्ड सी स्नीडर व पेग यांच्या मते ''निर्णय घेण्याच्या प्रक्रियेला नेतृत्व म्हणतातअर्थात राजकीय नेतृत्वात योग्यता ., संसुचन व उद्देश हया तीन घटकांना महत्त्व असून त्यांच्या परस्परावरील क्रिया प्रतिक्रियातून नेतृत्व साकार होते."[८]

➢ भारतीय समाजविज्ञान कोश मधील नेतृत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे "अनुयायामध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण करण्याची क्षमता, आपले उद्दिष्ट योग्य असल्याची जाणीव सहकाऱ्यांच्या मनात निर्माण करण्याचे सामर्थ्य, सामुदायिकरित्या व उद्दिष्टांच्या दिशेने कार्य करण्याची धडाडी या सर्वांचा अर्थ म्हणजे नेतृत्व."[९]

➢ लापेअर व फ्रान्सवर्थ यांच्या मते "ज्यांच्या वर्तनाचा इतरांच्या वर्तनावर खोलवर परिणाम होतोपरं .तू ज्यांच्यावर इतरांच्या वर्तनाचा विशेष असा परिणाम होऊ शकत नाही असा माणूस म्हणजे नेता होय". [१०]

➢ प्राचार्य अभ्यंकर यांच्या मते "मानवी संपर्कातील विभिन्नतेतला एका मुशीत घालून मानवी समुहाची शक्ती एका समान उद्दिष्टांकडे घेऊन जाणारी शक्ती म्हणजे नेतृत्व होय".[११]

➢ बेले एफ जी.यांच्या मते "नेतृत्व हा व्यवसाय आहे यशस्वी नेता अधिकाधिक सत्तेची साधने पैसा .बळ, संस्था, प्रसार माध्यमे वगैरे जमा करतो व त्याचा कुशलतेने वापर करतो .तसेच विरोधकांची साधने प्रभावहीन करतो".[१२]

➢ पांडे बी.एन. यांच्या मते "राजकारणी व्यक्ती अपघाताने नेते होत नसतात, तर त्यांच्याकडे काही दुर्मिळ व असामान्य गुण असतात विविध क्षेत्रात आणि विभिन्न स्तरावर .परिवर्तत घडवून आणण्याचे नेतृत्व एक साधन आहे लोकशाही व्यवस्थेत .नेतृत्वाची सक्षमता त्यांच्या अनुयायाकडून मिळणारा प्रतिसाद व सहकार्य यावर अवलंबून असतेनेता अनुयायी व तत्कालीन परिस्थिती यांत . घडलेल्याप्रतिक्रियेमधून नेतृत्व निर्माण होते ". नसून प्रक्रिया आहेम्हणून नेतृत्व ही व्यक्ती .[१३]

➢ रॉबर्ट डहालने आपल्या ^Modern Political Analysis* या ग्रंथातील Political Man या प्रकरणात राजकीय नेतृत्वाचा खालील प्रमाणे आकृतीबंध दर्शविला आहे .रॉबर्ट डहाल म्हणतो की, "सत्ताधीश, सत्ताकांक्षी, राजकीय स्तर व अराजकीय स्तर असे चार समूह सांगितले आहेत या .वर्गीकरणातील सत्ताधीश व सत्ताकांक्षी हे राजकीय नेते आहेतयाचा राजकीय निर्णयावर प्रभाव . कारण त्यांच्या जवळ राजकीय स्त्रोत.पडतोव कौशल्य अधिक प्रमाणात असते."[१४]

वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, राजकीय नेतृत्व म्हणजे राजकीय सत्ताधारी व्यक्ती, त्यांचे प्रतिस्पर्धी, देशविदे-शातील त्यांना मानणारे व न मानणारे अशा विविध घटकांचे भुतकाळ, वर्तमानकाळ तथा भविष्यकाळातील परस्परावलंबी सामुहीक वर्तन होयतव्दतच नेतृत्वाचे पुढारी ., अनुयायी व विशिष्ट परिस्थिती हे महत्त्वाचे तीन घटक असतातपुढारी व अनुयायी यांच्या परस्पर . वर्तनाचा उल्लेख केलाच आहे त्यांचे वर्तन ज्या .विशिष्ट परिस्थितीत घडतेम्हणून परिस्थिती .ती परिस्थिती कायम स्वरुपाची नसते . .बदलल्यास नेतृत्वही बदलते

नेता या पदाची व्याख्या अनेक प्रकारे करण्यात येते. 'नेता म्हणजे जिचा इतरांवर प्रभाव पडतो ती व्यक्ती', अशी एक व्याख्या करण्यात आली आहे. परंतु नेता व अनुयायी यांच्यामध्ये एकतर्फी अन्योन्यक्रिया चालत नसून अनुयायांचाही प्रभाव नेत्यावर पडत असतो. हे लक्षात घेता, वरील व्याख्या असमाधानकारक ठरते. 'समूहातील लोकप्रिय व्यक्ती म्हणजे त्या समूहाचा नेता' ही व्याख्या देखील समर्पक म्हणता येत नाही. कारण केवळ लोकप्रियता हे नेतृत्वाचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून पुरेसे नाही. लोकप्रिय असलेली व्यक्ती लोकमान्य असतेच असे नाही. 'समूहावर जिचे वर्चस्व असते ती व्यक्ती म्हणजे नेता', ही व्याख्याही समर्पक म्हणता येत नाही. कारण एखाद्या व्यक्तीचे समूहावरील वर्चस्व त्यांच्यावर लादलेले असू शकते किंवा समूहातील व्यक्तींच्या भीतीवर व लाचारीवर अधिष्ठित असू शकते. नेत्याचे वर्चस्व हे लोकांनी स्वेच्छेने स्वीकारलेले असते व त्याचे आदेश स्वीकार्य मानले जात असतात.

नेतृत्वाच्या समाजशास्त्रीय व्याख्येतून सामान्यतः आनुवांशिक हक्क, रुढी व साहीत्य–कलादी क्षेत्रांतील यश यांच्या आधारे अग्रेसर स्थान मिळविणाऱ्या लोकांना वगळण्यात येते. मॅकिआव्हेली, कार्लाइल यासारख्या विद्वानांनी एकोणिसाव्या शतकात लिहीलेल्या नेतृत्वावरील प्रबंधात नेतृत्वाच्या कल्पित क्षमतेवर व गुणविशेषांवर भर दिलेला आढळतो. पारंपरिक दृष्टिकोनाचा प्रभाव सैनिकी क्षेत्रात अजूनही टिकून असल्याचे दिसते. तथापि आधुनिक मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय अभ्यासात नेतृत्वातील व्यक्तींच्या व परिस्थितीच्या परस्पर संबंधांवर भर देण्यात येतो. नेतृत्वाच्या अभ्यासात चार गोष्टींचा विचार सामान्यपणे करण्यात येतो:

(१) नेता–त्याची योग्यता,व्यक्तिमत्त्व व अधिकार

(२) अनुयायी–त्यांची योग्यता व अधिकार

(३) परिस्थिती–जिच्या संदर्भात नेता व अनुयायीसंबंध निर्माण होतात

(४) गटाचे उद्दिष्ट किंवा कार्य.

सामूहीक उद्दिष्ट व सामूहीक जीवनाच्या दृष्टीने नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची आहे. समूहात एकजूट राखणे, तो सुस्थिर ठेवणे, समूहाच्या प्रयोजनास पोषक अशी कार्य विभागणी करणे, सर्व व्यक्तींमध्ये सुसंवाद साधणे व सर्वांचे समाधान करणे यांची जबाबदारी नेतृत्वावर असते. समूहावर बिकट प्रसंग आला असता त्यातून निभावून जाण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना आखणे, व्यक्तींना मार्गदर्शन करणे, त्यांच्या शक्ती कार्यान्वित करणे, व्यक्तींच्या आकांक्षांचा समूहाच्या मूलभूत प्रयोजनांशी मेळ घालून समूहाच्या रचनाबंधामध्ये समायोजनात्मक परिवर्तन घडवून आणण्यास हातभार लावणे इत्यादींसाठीही नेतृत्वाची आवश्यकता असते. हीच गोष्ट व्यापक समाजांनाही लागू आहे. रुढी व परंपरा यांमुळे काही समाजाची रचना सुबद्ध व सुस्थिर असते. अशा समाजांमध्ये व्यवसाय; धार्मिक श्रद्धा व समजुती तसेच आचार, नैतिक मूल्ये, भाषा इ. बाबतींत एकसमानता असते. त्यांचे संबंध सलोख्याचे, परस्परांना

हीतकारक व एकंदर समाजाच्या एकात्मतेस पोषक राहतील, हे पाहण्याचे कार्य समाजात मान्यता पावलेला वर्ग किंवा त्या वर्गाचे प्रतिनिधी करीत असतात. ज्या वेळी परिस्थितिजन्य कारणांमुळे तसेच समाजातील घटक वा वर्गांच्या बदलत्या आकांक्षा आणि वर्तन यांमुळे समाजाची पूर्वापार रचना असमाधानकारक ठरू पाहते, त्या वेळी तर लोकांच्या अभिवृत्तीत व वर्तनात बदलत्या परिस्थितीस अनुरूप असे परिवर्तन घडवून समाज अभंग राखण्यासाठी नेतृत्वाची आवश्यकता असते.

**नेतृत्वाचे प्रकार :** सुप्रसिद्ध जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांनी नेतृत्वाचे तीन प्रकार वर्णन केले आहेत.

१) पारंपरिक नेतृत्व

२) विभूतिरुप वा दैवी गुणमूलक नेतृत्व

३) कायद्यावर अधिष्ठित असलेले नेतृत्व.

अखंड व अबाधित अशी परंपरा असलेल्या समाजात वय, लिंग, वर्ग किंवा जात, व्यवसाय, सामाजिक वा राजकीय स्थान इत्यादींनुसार काही व्यक्तींकडे नेतृत्व सोपविले जात असते. अशा व्यक्तींच्या ठिकाणी नेतृत्वास आवश्यक असलेले गुण मूलतः नसले, तरी नेतृत्व करता करता काही गुण ते संपादन करू शकतात. ह्या परंपरासिद्ध नेतृत्वास लोक मान तुकवतात खरे परंतु हे नेतृत्व पूर्णपणे सक्षम असतेच असे नाही. बदलत्या परिस्थितीत तर त्याची अकार्यक्षमता विशेषच उघड होते. जेव्हा समाजजीवन अस्थिर होत असते किंवा अत्यंत कठिण प्रसंग निर्माण झालेले असतात, अशा वेळी जे नेतृत्व उदयास येते, ते समाजाची स्थिती सावरीत असताना. अशा नेतृत्वाच्या ठिकाणी सामान्यजनांना अलौकिकत्व व दिव्यत्वाचे दर्शन होते व त्यांची गणना ईश्वरी अवतार किंवा प्रेषित म्हणून होऊ लागते. या प्रकारच्या नेतृत्वास वेबरने 'दैवी नेतृत्व' ही संज्ञा दिली. हे नेतृत्व चिरकाल नसते व सातत्याने टिकणारे नसते. याउलट लोकांनी सुबुद्धपणे स्वीकारलेले व व्यक्तीच्या गुणांवर तसेच कायद्यावर आधारलेले नेतृत्व समाजास सातत्याने उपलब्ध होऊ शकते.

सक्रिय समाज सुधारणा करणाऱ्या नेतृत्वाचे मुख्यत्वे दोन प्रकार करता येतात

**हुकूमशाही नेतृत्व :** हुकूमशाही नेतृत्वाचा विशेष म्हणजे नेत्याकडे सर्वंकष सत्ता असते व ती स्वतःकडेच ठेवण्याचा व स्वतःचे सर्वश्रेष्ठ स्थान टिकवण्याचा प्रयत्न तो हरतऱ्हेने करीत असतो. हुकूमशहाच धोरणे ठरवितो, योजना आखतो, समूहासाठी त्याने ठरविलेला संपूर्ण कार्यक्रम तो सर्वस्वी उघड करीत नाही व स्वतःच्या निर्णयाची कल्पना इतरांना देत नाही. त्यांच्याकडून व्यक्तिपूजेस प्रच्छन्नपणे व उघडपणे प्रोत्साहन मिळते. समूहातील महत्त्वाच्या व्यक्तींशी तो स्वतंत्रपणे संबंध ठेवतो आणि त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध स्वतःच्या स्थानास धोकादायक ठरणार नाहीत, याविषयी तो दक्ष असतो. स्वतःचे महत्त्व अबाधित राहावे म्हणून तो अन्य कुणालाही फार काळपर्यंत महत्त्व लाभू देत नाही. अनुयायांमध्ये मोकळेपणाने मिसळत नाही. धर्म, पक्ष, पंथ, राष्ट्र इ. विषयींच्या लोकांच्या भावनांना आवाहन करून स्वतःचे नेतृत्व टिकवण्याचे प्रयत्नही त्यांच्याकडून होतात.

**लोकशाही नेतृत्व :**लोकशाही नेतृत्वाची शैली निरनिराळ्या प्रकारची असते. नेता स्वतःच्या हाती सर्व सत्ता केंद्रित करून न ठेवता सत्तेचे वितरण करतो. अधिकाधिक लोकाभिमुख होऊन तो स्वतःचे नेतृत्व टिकवितो. लोकांचे प्रेम व आदर हे लोकशाही नेत्यांच्या प्रतिष्ठेचे अधिष्ठान असते. लोकशाही वृत्तीचा नेता समूहाशी वा त्यातील महत्त्वाच्या व्यक्तींशी विचारविनिमय करून व समूहाच्या इच्छा-आकांक्षांचा आदर करून उद्दिष्टे, धोरणे व कार्यक्रम ठरवतो तसेच एकंदर कार्यक्रमाची स्पष्ट व पूर्ण कल्पना लोकांना देतो. धाक व भीती या तंत्रास लोकशाही नेतृत्वात स्थान नसते. व्यक्तिमत्त्वालाही प्रोत्साहन दिले जात नाही. समूहातील विविध घटकांत सहकार्याची भावना वाढीला लावली जाते व प्रत्येकाच्या कर्तृत्वास अवसर दिला जातो. समूहातील व्यक्तींना स्वतःचे विचार व भावना व्यक्त करण्यास मुभा असते.

**नेतृत्वाचे कार्य :** समूहाचे प्रयोजन व स्वरूप, समूहातील लोकांचे व्यक्तिमत्त्व आणि त्या त्या वेळचा प्रसंग या तीन गोष्टींवर नेतृत्वाला कराव्या लागणाऱ्या विशिष्ट भूमिका अवलंबून असतात. तरीपण सर्वसाधारण परिस्थितीत नेतृत्वाला जे कार्य करावे लागते, त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे असते :

१) संयोजन : समूहाच्या तात्कालिन गरजा व उपलब्ध साधने, दूरवरची उद्दिष्टे व त्यांची साधने, या सर्वांचा विचार करून योजना आखणे.

२) धोरणे ठरविणे

३) धोरणांची अंमलबजावणी व त्यासाठी कार्यविभागणी करणे

४) विशेष प्राविण्य या नात्याने साहाय्य करणे

५) समूहाचे प्रतिनिधित्व करणे

६) समूहातील व्यक्तिव्यक्तींतील किंवा समूहांतर्गत गटागटांतील संबंधांवर व त्यांच्या वर्तनावर आवश्यक त्या उपायांचा अवलंब करून नियंत्रण ठेवणे

७) स्वतःचे वर्तन नमुनेदार ठेवून समूहापुढे आदर्श ठेवणे

८) समूहाचा रक्षणकर्ता म्हणून एक प्रकारे पित्याची भूमिका सांभाळणे.

कधीकधी लोकांच्या वैफल्याचे आणि असंतोषाचे खापर नेतृत्वाच्या माथी फोडले जाते व त्यासाठी नेत्यास बळी दिले जाते. अशा वेळी मानसिक समतोल राखून समूहाचे फाटाफुटीपासून संरक्षण करण्याचे काम नेतृत्वाला करावे लागते.

यशस्वी नेतृत्वाबाबत जी अनेक संशोधने झाली आहेत, त्यांचे काही निष्कर्ष नियमरूपाने सांगता येणे शक्य आहे.

१) समूहाला असे वाटले पाहीजे, की नेता हा आपल्यापैकीच एक आहे, बाहेरचा नाही. त्यासाठी नेत्याची मूल्ये व अभिवृत्ती आणि समूहाची मूल्ये व अभिवृत्ती यांमध्ये फार तफावत नसावी. असल्यास नेतृत्वास ओहोटी लागते. म्हणूनच यशस्वी नेते समूहात मिसळतात व त्यांच्या जीवनात सहभागी होत असल्याचे दाखवीत असतात.
२) पण त्याबरोबरच अनुयायांना असेही वाटले पाहीजे, की आपल्याला इष्ट वाटणारे गुण नेतृत्व करणाऱ्याच्या ठिकाणी अधिक प्रमाणात आहेत.
३) आपल्यापैकीच एक, पण बुद्धी, ज्ञान, कर्तबगारी इ. बाबतींत आपल्यापैकी उत्तम व्यक्ती, असे नेत्याविषयी अनुयायांना वाटले पाहीजे. त्याबरोबरच त्याचे गुण व चारित्र्य आपल्या अनुकरणाच्या आवाक्यातील आहे, असेही त्यांना वाटले पाहीजे अन्यथा त्यांच्या अतिश्रेष्ठत्वामुळे त्याला देव्हाऱ्यात बसवून अनुयायी मोकळे होतात व नावापुरतेच अनुयायी राहतात.
४) नेतृत्वाने समूहाच्या गरजा व अपेक्षा लक्षात घेऊन वागले पाहीजे. नेत्याकडून, अपेक्षित असलेली कार्ये, कार्यपद्धती तसेच व्यक्तिमत्त्वगुण व चारित्र्यगुण यांच्या बाबतींत समूहाचा अपेक्षाभंग झाल्यास त्याचे नेतृत्व ओहोटीस लागते. 'मी त्यांचा नेता आहे ना, मग मला त्यांना अनुसरून चालले पाहीजे', हे राजकीय नेत्याचे उद्‌गार या दृष्टीने मार्मिक होत. यापद्धतीने नेतृत्वाची मीमांसा दिसून येते.

राजकीय नेता व त्याचे अनुयायी मुलत .समाजाचे घटक असतात :त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाची उगमस्थाने किंवा स्रोत समाजाच्या विविध संस्थांमध्ये आढळताततती खालीलप्रमाणे .

**कुटूंब :**ऑरिस्टॉटलच्या मते, कुटूंब' ही सामाजिक जीवनाची पाठशाळा होय'. कुटूंबाद्वारे राजकीय निष्ठा व सामाजिक श्रद्धा यांचा पाया तीन प्रकारे घातला जातो -किंवा सुप्त शिक्षणातून घरात आई एक म्हणजे उघड .वडील, मोठी भावंडे यांची राजकीय घडामोडीवर जी चर्चा चालते त्याचा मुलांवर प्रभाव .पडतो दुसरे .वडिलांच्या राजकीय मताशी मुले सुसंगत असतात :साधारणत .म्हणजे व्यक्तिमत्वाला वळण लावणे, व्यायाम, अभ्यास, शिष्टाचार यासंबंधी सुसंस्कारीत कुटूंबात प्रयत्नपूर्वक वळण लावले जातेतिसरे . म्हणजे जात, वर्ण, वर्ग या सामाजिक संदर्भाचा प्रभाव देखील याच काळात दृढ होतो.[१५]

**शिक्षण संस्था :** शिक्षणसंस्था या राजकीय सामाजिकीकरणाची आणि नेतृत्व निर्मितीचे प्रभावी साधन मानले जातेकाही वर्षापूर्वी . त्य देशांच्या केलेल्यापाश्चा आठसर्वेक्षणाच्या आधारे प्रा चार्लस मेरियमने ."शाळा म्हणजे नागरी शिक्षणाचे प्रभावी साधन असे म्हटले आहे" आल्मंड, व्हर्बा या विचारवंतांनी पाच देशांच्या सर्वेक्षणावरून असा निष्कर्ष काढला की, "शाळा कॉलेजस् व्यतिरिक्त राजकीयकरणाचे इतके प्रभावी दुसरे साधन नाही" [१६]

**श्रेष्ठत्वाची भावना :** समाजाच्या वरिष्ठ वर्गातून व जातीतून नेतृत्वाची भरती मोठया प्रमाणात होतेगावातील पाटील .उदा ., देशमुख, जमीनदार, उच्च जाती मधील प्रतिष्ठित नागरिक यांची मुले राजकारणात येतात समाजाचे पुढारीपण स्वाभाविकपणे .त्यांच्याकडे येते . कारणश्रेष्ठत्वाची भावना त्यांच्यामध्ये असते मात्र सर्वच .राजकीय नेते सामाजिकदृष्टया प्रतिष्ठित वर्गातून येतात असे नाही.[१७] सामान्यत युवकांमध्ये श्रेष्ठत्वाची किंवा आत्मसन्मानाची :भावना निर्माण होण्यासाठी घराण्याची सामाजिक प्रतिष्ठा, श्रीमंती, बुद्धिची गुणवत्ता, बुद्धिची चलाखी, शारीरिक सामर्थ्य, खेळ किंवा कलेतील नैपुण्य, अभिनय कुशलता हे घटक महत्वपूर्ण आहेतवरीलपैकी . कोणत्याही बाबतीतसंपन्न असलेल्या व्यक्तीमध्येच श्रेष्ठत्वाची किंवा आत्मसन्मानाची भावना असते .व ते नेतृत्वास पोषक असते.

**महत्वाकांक्षा :** निरनिराळया राजकीय नेत्यांची चरित्रे तपासून पाहीली तर त्यांच्या बालवयातच महत्वाकांक्षेचे बीजारोपण झालेले दिसते छत्रपती शिवाजी .उदा .महाराजांमध्ये सरदार शहाजी राजांचा मुलगा म्हणून श्रेष्ठत्वाची भावना, बालपणापासून जिजामातेचे शूरत्वाचे संस्कार, शिवाय रामायण,महाभारतातील कथांची शिकवण, शस्त्र तथा शास्त्राचे प्रात झालेले शिक्षण यामुळे त्यांच्यातील महत्वाकांक्षा विकसित झालीप्रखर मह .त्वाकांक्षेखेरीज नेतृत्वाची उभारणी होऊ शकत नाही.[१८]

**राष्ट्र व समाज भक्ती :** राष्ट्र व समाजाची ही आणखी एक भावना नेतृत्व निर्मितीला पूरक असू शकते . देश व समाजाबद्दल आत्यंतिक प्रेम व अभिजात राष्ट्रभक्तीमुळे लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोससावरकर , यांचे नेतृत्व विकसीत झाले तसेच सामाजिक समतेच्या तीव्र आकांक्षेमुळे महात्मा .ज्योतीराव फुले, शाहू महाराज ,डॉबाबासाहेब आंबेडकर आणि . कांशिरामयांचे नेतृत्व प्रस्थापित झाले.[१९]

व्यक्तिगत नेतृत्व, विशिष्ट गटलक्ष्यी नेतृत्व, बहुसंख्याकांचे नेतृत्व आणि सामूहीक सत्संकल्प किवा सकलजनवादी नेतृत्व अशा चार गटांमध्ये इथे नेतृत्व संकल्पनेचे वर्गीकरण केले जाते.

**सारांश:** अशा पद्धतीने नेतृत्वाच्याविवेचनावरून असे स्पष्ट होते की, नेतृत्वामध्ये राजकीय नेतृत्व प्रभावी ठरत असते .कारण प्रत्येक समाजात काही प्रश्न समस्या असतात,त्या प्रश्न . समस्या ह्या त्या समाजातील व्यक्तीच्या जिवनाशी निगडीत असल्यामुळे त्यासाठी समाजात लोक एकत्र येतात .चळवळ, मोर्चा, आंदोलने करुन संघटना निर्माण करतात संघटनेची .कार्य व्यवस्थित व्हावीत व संघटनेचे ध्येय साध्य करता यावे यासाठी नेतृत्वाची आवश्यकता असते कडेनेतृत्व योग्य व्यक्ती .दिले तर समस्यांची सोडवणूक होऊ शकते र्थ म्हणजेपहीला अ .नेतृत्वाचे दोन अर्थ आहेत .अग्रणी होणे, प्रसिध्द होणे .दुसरा अर्थ आहे दुसऱ्यांना मार्ग दाखविणेसंघटनेचे . मुख्य बननेकिंवा आदेश देणे."[१९] तसेच नेतृत्वाकरीता विशिष्ट अशा गुणांची आवश्यकता असते नेतृत्वाच्या ठिकाणी .योग्य वेळी योग्य व तात्काळ निर्णय घेण्याची क्षमता असावी लागते आपण घेतलेल्या निर्णयाची .अंमलबजावणी करण्यासाठी ती गोष्ट अनुयायांना समजावून सांगण्याची व त्यांना क्रियाशिल बनविण्याची क्षमता ही नेतृत्वामध्ये असावी लागतेघेतलेल्या निर्णयावरुन .

कोणत्याही चांगल्याकिंवा वाईट कार्याकरीता स्वत त्याही क्षेत्रातील नेतृत्व प्रदीर्घकोण .जबाबदारी घ्यावी लागते :संघर्षानंतर स्थापन होते .नेतृत्व टिकविण्यासाठी सहनशिलता व धैर्याची आवश्यकता असते .निस्वार्थ वृत्ती:, त्याग, देशप्रेम, समाजाहीताची कळकळ, जनतेविषयी करुणा इत्यादी गुण नेत्याच्या ठिकाणी असावे लागतात नेतृत्वाला समाजाची अधिमान्यता एवढे गुण असूनही त्या . जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत हे नेतृत्व समाजाला मान्य होत नाही म्हणजेच लोकांची ज्या वेळेस .मान्यता मिळते त्यावेळेसच खऱ्या अर्थाने सत्ता गाजवता येते.

**संदर्भसूची :**

१. Cartwright, D. Zander, (1960), A. F. Group Dynamics : Research and Theory, Row,. P.N. 46

२. Krech, David , (1962), “Individual in Society: A Textbook of Social Psychology”, New York. P.N. 89

३. खेकाळे ना ,‘राजकीय नेतृत्व’’ ,(१९९९),.रा.श्री मंगेश प्रकाशन२.क्र.पृ.नागपूर,

४. पवार प्रकाश,,(२०१४) “वाटचाल भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची’’, डायमंड पब्लिकेशन.४ .क्र.पृ .पुणे ,

५. Webster's (1960),”New Twentieth Century Dictionary of English language”, The world publishing company, New Delhi, P.N.1030

६. Weber Max, (1947) The theory of social and economics organization, free press, New york. P.N. 324

७. Lord Lloyd of Dolobrain,(1939),“Leadershipin Democracy” London oxford University Press. P.N. (423

८. Gabrial Almond,(1960) , Politics of Developing Areas Politics’, Basil Balackwell Publisher, Ltd. Oxford UK P.N.20

९. गर्गे स.मा ., (१९९९(, “भारतीय समाजविज्ञान कोष”, समाजविज्ञान मंडळ प्रकाशन, पुणे. पृ१७० .क्र.

१०. हुल्याळकरकावळे ,, गोळे, .३९९ .क्र.पृ (१९७२)

११. अभ्यंकर, (१९६६(, “नेतृत्वाचे पैलू’’, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे९९ .क्र.पृ ,

१२. Bailey F.G., ((1969, ”Strategies and spoilas - A Social Anthropology “P.N.36.

१३. Pandey B. N., (1977), ‘Leadership in south Asia’, Vikas Publishing House, New Delhi P.N.291.

१४. खेकाळे ना ,‘राजकीय नेतृत्व’’ ,(१९९९),.रा.श्री मंगेश प्रकाशन२०क्र .पृ.नागपूर,

१५. उपरोक्त१०३ .क्र.पृ,

१६. उपरोक्त१०४ .क्र.पृ,

१७. उपरोक्त१०५ .क्र.पृ ,

१८. उपरोक्त१०६.क्र.पृ ,

१९. भोळे, भा.ल., (२०१०(, “राजकीय विश्लेषण’’, पिंपळापूरे बुक्स डिस्ट्रीब्यूटर्स, नागपूर, पृ.१३६ .क्र.